पैगंबर मुहम्मद (स.)

लोककल्याणाची प्राणज्योत

(दिव्यबोध)

संकलन

प्रा. अब्दुर्रहमान शेख

अनुक्रमणिका

"अल्लाह, असीम दयावंत व परम कृपावंताच्या नावाने"

१. त्यांचे आचरण व त्यांचे चरित्र

१.१ कोमल स्वभावी

"हे पैगंबर (स.) ही अल्लाहची मोठी कृपा आहे की तुम्ही या लोकांसाठी फार कोमल स्वभावी ठरला आहात. एरव्ही जर तुम्ही एखादे वेळी शीघ्रकोपी स्वभावी व निष्ठूर असता तर हे सर्वजण तुमच्यापासून विभक्त झाले असते."

(दिव्य कुरआन, ३ : १५९)

१.२ क्षमाशील

"हे ग्रंथधारकांनो! आमचा पैगंबर तुमच्यापाशी आला आहे जो ईशग्रंथातील पुष्कळशा त्या गोष्टी तुमच्यासमोर स्पष्ट करीत आहेत, ज्यावर तुम्ही पडदा टाकीत आहात आणि तुमच्या कित्येक गोष्टी माफही करतो." (दिव्य कुरआन, ५ : १५)

१.३ अति संकटातही अल्लाहवरील भिस्त ढळून देणारे.

"जेव्हा ते दोघे गुहेत होते, तेव्हा तो आपल्या साथीदाराला सांगत होता, 'दुःखी होऊ नकोस, अल्लाह आमच्यासमवेत आहे.' त्यावेळी अल्लाहने त्याच्यावर मन:शांती उतरविली आणि त्याला अशा लष्कराद्वारे मदत केली जे तुम्हाला दिसत नव्हते आणि अश्रद्धावंतांचे (काफिर) वचन खाली पाडले व अल्लाहचे वचन तर उच्चच आहे. अल्लाह जबरदस्त आणि द्रष्टा व बुद्धिमान आहे." (दिव्य कुरआन, ९ : ४०)

१.४ इमानधारकांसाठी सर्वस्वी कृपा आहे.

"यांच्यापैकी काहीजण आहेत जे आपल्या शब्दांनी पैगंबराला दुःख देतात आणि म्हणतात की हा माणूस कानाचा हलका आहे, सांगून टाका, तो तुमच्या भल्यासाठी तसा आहे, अल्लाहवर श्रद्धा ठेवतो व इमानधारकांवर विश्वास करतो आणि सर्वस्वी कृपा आहे त्या लोकांसाठी जे तुम्हापैकी इमानधारक आहेत. आणि जे लोक अल्लाहच्या पैगंबराला दुःख देतात त्यांच्यासाठी दुःखदायक शिक्षा आहे."

(दिव्य कुरआन, ९ : ६१)

१.५ लोकांच्या नुकसानीवर कष्टी होतात आणि त्यांच्या कल्याणाचे लोभी आहेत.

"पहा! तुम्हा लोकांजवळ एक पैगंबर आला आहे जो खुद्द तुम्हांपैकीच आहे. तुम्हाला नुकसान पोहचणे त्याला जड वाटते. तुमच्या कल्याणाचा तो इच्छुक आहे. इमानधारकांसाठी तो प्रेमळ आणि दयाळू आहे." (दिव्य कुरआन, ९ : १२८)

१.६ शिकवणीवर श्रद्धा न ठेवणाऱ्यांसाठी जिवापाड दुःख करणारे.

"बरे तर हे पैगंबर (स.)! तुम्ही यांच्यामागे दुःखापायी आपले प्राण गमावणार आहात जर यांनी या शिकवणुकीवर श्रद्धा ठेवली नाही?" (दिव्य कुरआन, १८ : ६)

१.७ जगवासीयांसाठी साक्षात कृपा म्हणून पाठविले आहे.

"हे पैगंबर (स.)! आम्ही तर तुम्हाला सर्वांसाठी कृपा बनवून पाठविले आहे. त्यांना सांगा, माझ्यापाशी जो दिव्य बोध येतो तो असा आहे की तुमचा ईश्वर केवळ एकच अल्लाह आहे, मग तुम्ही आज्ञापालनासाठी मान तुकविता काय?"

(दिव्य कुरआन, २१ : १०७-१०८)

१.८ श्रद्धा न ठेवणाऱ्यांसाठी जिवापाड दुःख मानणारे.

"हे पैगंबर (स.)! कदाचित तुम्ही या दुःखाने आपले प्राण गमावून बसाल की हे लोक श्रद्धा ठेवत नाही. आम्ही इच्छिले तर आकाशातून अशी निशाणी उतरवू शकतो की यांच्या माना त्यापुढे नमतील." (दिव्य कुरआन, २६ : ३)

१.९ लोकांसाठी उत्कृष्ट आदर्श आहेत.

"वस्तुतः तुम्हा लोकासाठी अल्लाहचे पैगंबर एक उत्कृष्ट आदर्श आहे, त्या प्रत्येक माणसासाठी जो अल्लाह व मरणोत्तर जीवनातील मोबदल्याच्या दिवसाचा उमेदवार असेल आणि बहुतांशी अल्लाहचे स्मरण करीत असेल."

(दिव्य कुरआन, ३३ : २१)

१.१० लज्जा बाळगणारे

"हे लोकहो! ज्यांनी इमान धारण केले आहे, नबी (स.) यांच्या घरात विना परवानगी प्रवेश करू नका. जेवणाच्या वेळेवरही नजर राखून असू नका. जर तुम्हाला जेवायला बोलाविले गेले तर अवश्य या. परंतु जेवण उरकले की निघून जा. गोष्टी करण्यात लागू नका. तुमच्या या कृती नबी (स.) यांना त्रास देतात, परंतु ते संकोचाने

काही बोलत नाहीत आणि अल्लाहला खरी गोष्ट सांगण्यात संकोच वाटत नाही.''

(दिव्य कुरआन, ३३ : ५३)

१.११ लोक मार्गभ्रष्ट होण्याने दुःख व शोकात विरघळणारे.

''(हे पैगंबर (स.)! तुमचा जीव या लोकांसाठी दु:खात व शोकात गमावू नका. जे काही हे करीत आहेत, अल्लाह हे चांगल्या प्रकारे जाणतो.''

(दिव्य कुरआन, ३५ : ८)

१.१२ उच्च कोटीची नीतिमत्ता बाळगणारे.

''आणि नि:संशय तुम्ही नीतिमत्तेच्या उच्च दर्जावर आहात. लवकरच तुम्हीही पाहाल आणि तेही पाहतील की तुमच्यापैकी कोण वेडेपणात गुरफटलेला आहे.''

(दिव्य कुरआन, ६८ : ४-६)

१.१३ रात्री झोप मोडून प्रार्थना व उपासना करणारे.

''हे पैगंबर (स.) तुमचा पालनकर्ता जाणतो की तुम्ही कधी सुमारे दोन तृतियांश रात्र आणि कधी अर्धी रात्र आणि कधी एक तृतियांश रात्र उपासना करीत उभे राहता.''

(दिव्य कुरआन, ७३ : २०)

२. तेही माणूस होते

२.१ ''मी तुम्हाला असे सांगत नाही की माझ्या जवळ अल्लाहचे खजिने आहेत. मला परोक्षाचे ज्ञानही नाही व मी दूत ही नाही.''

''हे पैगंबर (स.), यांना सांगा, ''मी तुम्हाला असे सांगत नाही की माझ्याजवळ अल्लाहचे खजिने आहेत. मला परोक्षाचे ज्ञानही नाही व असेही सांगत नाही की मी ईशदूत आहे. मी तर केवळ त्या 'वह्य' (दिव्य अवतरण) चे पालन करतो. जे माझ्यावर अवतरले जाते.'' मग यांना विचारा, आंधळा व डोळस दोघे समान असू शकतात काय? तुम्ही विचार करीत नाही.'' (दिव्य कुरआन, ६ : ५०)

२.२ प्रकोप आणण्याचा अधिकार बाळगत नाही.

''ती गोष्ट मुळीच नाही जिच्या बद्दल तुम्ही घाई करीत आहात, निर्णयाचा सर्वस्वी अधिकार अल्लाहला आहे. तोच सत्य बाबी सांगतो आणि तोच सर्वोत्कृष्ट निवाडा करणारा आहे. सांगा, जर एखादे वेळी ती गोष्ट माझ्या अखत्यारीत असती जिच्यासाठी तुम्ही घाई करीत आहात तर माझ्यात आणि तुमच्यात केव्हाच निर्णय लागला असता.''

(दिव्य कुरआन, ६ : ५७-५८)

२.३ स्वत:करिता कोणत्या ही नफ्याचा व नुकसानीचा अधिकार बाळगत नाही.

''हे पैगंबर (स.) यांना सांगा की, ''मी स्वत:करिता कोणत्याही नफा-तोट्याचा अधिकार बाळगत नाही, अल्लाहच जे काही इच्छितो ते होते आणि जर मला परोक्षाचे ज्ञान असते तर मी पुष्कळसे लाभ स्वत:साठी प्राप्त करून घेतले असते व मला कधीही एखादे नुकसान पोहचले नसते. मी तर केवळ एक खबरदार करणारा व खूशखबर ऐकविणारा आहे. त्या लोकांसाठी जे माझे म्हणणे मान्य करतील.''

(दिव्य कुरआन, ७ : १८८)

२.४ सांगा, माझ्या अखत्यारीत तर माझी स्वत:ची हानी व लाभ देखील नाही.

''म्हणतात, जर तुमची ही धमकी खरी असेल तर ती पूर्ण तरी केव्हा होईल? सांगा, माझ्या अखत्यारित तर माझी स्वत:ची हानी व लाभ देखील नाही, सर्वकाही

अल्लाहच्या इच्छेवर अवलंबून आहे.'' (दिव्य कुरआन, १० : ४८-४९)

२.५ पूर्वी पाठविलेल्या पैगंबरांनाही पत्नी व मुलेबाळे होते.

''तुमच्यापूर्वीदेखील आम्ही अनेक पैगंबर पाठविले आहेत आणि त्यांना आम्ही पत्नी व मुले-बाळे असलेलेच बनविले होते आणि कोणत्याही पैगंबराचे हे सामर्थ्य नव्हते की अल्लाहच्या आज्ञेशिवाय एखादी निशाणी त्याने स्वत:च आणून दाखविली असती.'' (दिव्य कुरआन, १३ : ३८)

२.६ जर जमिनीवर दूत समाधानाने वावरत असते तर आकाशातून आम्ही दूतच पैगंबर म्हणून पाठविला असता.

''लोकांसमोर जेव्हा कधी मार्गदर्शन आले तेव्हा त्याच्यावर इमान धारण करण्यासाठी त्यांना कोणत्याही गोष्टीने रोखले नाही. परंतु त्यांच्या याच वचनाने की, काय अल्लाहने मनुष्याला पैगंबर बनवून पाठविले? यांना सांगा, जर भूतलावर ईशदूत समाधानाने वावरू लागले असते तर जरूर आम्ही आकाशातून एखाद्या ईशदूतालाच त्यांच्यासाठी पैगंबर बनवून पाठविले असते.'' (दिव्य कुरआन, १७ : ९४-९५)

२.७ हे पैगंबर (स.)! तुमच्या अगोदर सुद्धा आम्ही माणसांनाच पैगंबर म्हणून पाठविले होते.

''आणि हे पैगंबर (स.), तुमच्या अगोदरसुद्धा आम्ही माणसांनाच पैगंबर म्हणून पाठविले होते, ज्यांच्यावर आम्ही दिव्यबोध प्रकट करीत होतो. तुम्हाला जर याचे ज्ञान नसेल तर ग्रंथधारकांना विचारून घ्या. त्या पैगंबरांना आम्ही आहार विरहित शरीर संपदा दिली नव्हती. तसेच ते अमर देखील नव्हते.''

(दिव्य कुरआन, २१ : ७-८)

२.८ हे पैगंबर (स.), तुमच्या पूर्वी पाठविलेले पैगंबर अन्न खाणारे, बाजारात हिंडणारे, फिरणारेच होते.

''हे पैगंबर (स.)! तुमच्यापूर्वी जे कोणतेही पैगंबर आम्ही पाठविले होते, ते सर्वही अन्न खाणारे आणि बाजारात हिंडणारे, फिरणारे लोकच होते.''

(दिव्य कुरआन, २५ : २०)

२.९ लोक तुम्हाला विचारतात की प्रलयाची घटका केव्हा येईल? सांगा त्याचे ज्ञान अल्लाहला आहे.

"लोक तुम्हाला विचारतात की पुनरुत्थानाची घटका केव्हा येईल. सांगा, त्याचे ज्ञान तर अल्लाहलाच आहे. तुम्हाला काय खबर कदाचित ती जवळच येऊन ठेपली असेल." (दिव्य कुरआन, ३३ : ६३)

२.१० यांना सांगा, "मी कोणी निराळा पैगंबर तर नाही. मला माहीत नाही की उद्या काय घडेल."

"यांना सांगा, मी कोणी निराळा पैगंबर नाही. मला माहीत नाही की उद्या तुमच्याशी काय घडेल व माझ्याशी काय, मी तर केवळ त्या दिव्यबोधाचे अनुसरण करतो जे माझ्याकडे पाठविले जाते आणि मी एक स्पष्टपणे सावध करणाऱ्या शिवाय अन्य काही नाही." (दिव्य कुरआन, ४६ : ९)

३. पैगंबरांच्या जबाबदाऱ्या

३.१ अल्लाहच्या आयती ऐकविणे, लोक जीवन सावरणे, ग्रंथ व विवेकाची शिकवण देणे.

"मी तुमच्यामध्ये खुद्द तुमच्यामधूनच एक पैगंबर पाठविला जो तुम्हाला आमचे संदेश (आयती) ऐकवीत आहे. आणि तुमचे जीवन पवित्र करून तुम्हाला ग्रंथ व विवेकाची शिकवण देत आहे. आणि तुम्हाला त्या गोष्टी शिकवीत आहे ज्या तुम्हाला माहीत नाहीत." (दिव्य कुरआन, २ : १५१)

३.२ पैगंबर मुहम्मद (स.) अल्लाहने सांगितलेल्या मार्गाचेच अनुसरण करतात.

"त्यांना स्पष्टपणे सांगा की अल्लाहने सांगितलेला मार्गच योग्य आहे. अन्यथा तुझ्याकडे आलेल्या ज्ञानानंतर जर तू त्यांच्या इच्छांचे अनुसरण करशील तर अल्लाहच्या प्रकोपापासून वाचविणारा तुझा कोणीही मित्र किंवा सहाय्यक असणार नाही." (दिव्य कुरआन, २ : १२०)

३.३ जर तुम्ही दिव्य बोध ऐवजी त्यांच्या इच्छेचे अनुसरण केले तर जालिम लोकांत सामील व्हाल.

"तेव्हा जर ज्ञानानंतर (दिव्य बोध) जे तुमच्याकडे आले आहे, त्यांच्या इच्छेनुसार अनुसरण केलेत तर खचितच तुमची गणना अत्याचाऱ्यांमध्ये होईल."

(दिव्य कुरआन, २ : १४५)

३.४ मुहम्मद (स.) याशिवाय काहीच नाहीत की ते एक पैगंबर आहेत.

"मुहम्मद (स.) याशिवाय काही नाहीत की ते केवळ एक पैगंबर आहेत, त्यांच्यापूर्वी इतर पैगंबर देखील होऊन गेले आहेत." (दिव्य कुरआन, ३ : १४४)

३.५ पैगंबर लोकजीवनाला सावरतो व त्यंना ग्रंथ व बुद्धीमत्तेची शिकवण देतो.

"खरे तर इमानधारकांवर अल्लाहने तर हे फार मोठे उपकार केले आहे की त्यांच्या दरम्यान खुद्द त्यांच्याचपैकी एक अशा पैगंबराला उभे केले जो त्याची

संकेतवचने (आयती) त्यांना ऐकवितो, त्यांच्या जीवनाला सावरतो आणि त्यांना ग्रंथ व विद्वत्तेची शिकवण देतो. वास्तविक पाहता हेच लोक या पूर्वी उघडपणे मार्गभ्रष्ट झाले होते.''

(दिव्य कुरआन, ३ : १६४)

३.६ हे नबी (स.)! अल्लाहने जो सरळमार्ग तुम्हाला दाखविला आहे त्यानुसार न्यायनिवाडा करा.

''हे नबी (स.)! आम्ही हा ग्रंथ सत्यानिशी तुमच्याकडे उतरविला आहे की जो सरळमार्ग अल्लाहने तुम्हाला दाखविला आहे त्यानुसार लोकांमध्ये न्यायनिवाडा करा. तुम्ही अपहार करणारांचे समर्थक बनू नका. अल्लाहजवळ क्षमेची याचना करा. तो मोठा क्षमा करणारा व दयावंत आहे. जे लोक स्वत:शी बेइमानी करतात, तुम्ही त्याचे समर्थन करू नका.''

(दिव्य कुरआन, ४ : १०५-१०७)

३.७ लोकांना अंधारातून बाहेर काढून प्रकाशाकडे आणतो व सरळ मार्गाकडे मार्गदर्शन करतो.

''हे ग्रंथधारकांनो! आमचा पैगंबर तुमच्यापाशी आला आहे जो ईशग्रंथातील पुष्कळशा त्या गोष्टी तुमच्यासमोर स्पष्ट करीत आहे ज्याच्यावर तुम्ही पडदा टाकीत आहात आणि तुमच्या कित्येक गोष्टी माफही करतो. तुमच्यापाशी अल्लाहकडून प्रकाश आणि एक असा सत्यदर्शी ग्रंथ आला आहे, ज्याच्याद्वारे सर्वश्रेष्ठ अल्लाह त्या लोकांना जे त्याच्या प्रसन्नतेचे इच्छुक आहेत, शांती व सुरक्षिततेच्या पद्धती दाखवितो आणि आपल्या आदेशाने त्यांना अंधारातून बाहेर काढून प्रकाशाकडे आणतो आणि सरळ मार्गाकडे त्यांचे मार्गदर्शन करतो.''

(दिव्य कुरआन, ५ : १५-१६)

३.८ आता तो खुशखबर देणारा व भय दाखविणारा आला आहे.

''हे ग्रंथधारकांनो! आमचा हा पैगंबर अशा वेळी तुमच्यापाशी आला आहे आणि धर्माची अशी सुस्पष्ट शिकवण तुम्हाला देत आहे. जेव्हा पैगंबरांच्या आगमनाचा क्रम एका दीर्घ काळापासून बंद होता. ते अशाकरिता की तुम्ही असे सांगू नये की आमच्यापाशी कोणी शुभवार्ता देणारा आणि भय दाखविणारा आला नाही. तर पाहा, आता तो शुभवार्ता देणारा व भय दाखविणारा आला आहे आणि अल्लाह प्रत्येक वस्तूवर प्रभुत्वसंपन्न आहे.''

(दिव्य कुरआन, ५ : १९)

३.९ तुम्हा प्रत व ज्या ज्या लोकांप्रत हा (कुरआन) पोहचेल त्या सर्वांना मी सावध करावे.

"आणि हा कुरआन माझ्याकडे 'वह्य' (दिव्य अवतरण) द्वारे पाठविला गेला आहे. जेणेकरून तुम्हाप्रत आणि ज्या ज्या लोकांपर्यंत हा पोहोचेल त्या सर्वांना मी सावध करावे. काय खरोखरच तुम्ही अशी साक्ष देऊ शकता की अल्लाह बरोबर इतर ईश्वर देखील आहेत? सांगून टाका, अशी साक्ष तर मी कदापि देऊ शकत नाही. सांगून टाका, ईश्वर तर तोच एक आहे आणि मी त्या अनेकेश्वरवाद्यांपासून सर्वस्वी अलिप्त आहे. ज्यात तुम्ही गुरफटला आहात." (दिव्य कुरआन, ६ : १९)

३.१० तो त्यांना सदाचारी आज्ञा देतो, दुराचारापासून रोखतो.

"(म्हणून आज ही कृपा त्या लोकांचा वाटा आहे.) जे या निरक्षर पैगंबर-नबी (स.) यांचे अनुयायित्व स्वीकार करतील ज्यांचा उल्लेख त्यांना त्यांच्या तौरात व इंजीलमध्ये लिखित स्वरूपात आढळतो. तो त्यांना सदाचाराची आज्ञा देतो, दुराचारापासून रोखतो, त्यांच्यासाठी स्वच्छ वस्तू हलाल करतो व अस्वच्छ वस्तू हराम करतो, आणि त्यांच्यावरून ते ओझे उतरवितो जे त्यांच्यावर लादलेले होते आणि त्यांना त्या बंधनातून ज्यामध्ये ते जखडलेले होते. म्हणून जे लोक पैगंबर (स.) यांच्यावर इमान धारण करतील आणि याचे समर्थन व सहाय्य करतील व त्या प्रकाशाचे अनुसरण करतील जो याच्याबरोबर अवतरला गेला आहे, तेच सफल होणारे आहेत." (दिव्य कुरआन, ७ : १५७)

३.११ हे मुहम्मद (स.)! सांगा, 'मी तुम्हा सर्वांकडे त्या अल्लाहचा पैगंबर आहे.'

"हे मुहम्मद (स.)! सांगा, हे मानवांनो! मी तुम्हा सर्वांकडे त्या अल्लाहचा पैगंबर आहे जो पृथ्वी व आकाशांच्या राज्यांचा स्वामी आहे. त्याच्याशिवाय इतर कोणीही ईश्वर नाही. तोच जीवन प्रदान करतो व तोच मृत्यू देतो. म्हणून इमान धारण करा अल्लाहवर आणि त्याने पाठविलेल्या निरक्षर नबी (स.) वर जो अल्लाह व त्याच्या आदेशांना मानतो. आणि अनुसरण करा त्याचे, जेणेकरून तुम्ही सरळमार्ग प्राप्त कराल." (दिव्य कुरआन, ७ : १५८)

३.१२ हे पैगंबर (स.) त्यांना सांगा, ''माझे हे काम नव्हे की कुरआनात काही फेरबदल करावा.'' म्हणतात, ''याच्या ऐवजी एखादा अन्य कुरआन आणा अथवा याच्यात काही बदल करा.''

"हे पैगंबर (स.) त्यांना सांगा, माझे हे काम नव्हे की मी आपल्याकडून याच्यात काही फेरबदल करावा. मी तर केवळ त्या दिव्य प्रकटनाचे अनुसरण करणारा आहे, जे माझ्याकडे पाठविले जाते. जर मी आपल्या पालनकर्त्याची अवज्ञा केली तर मला एका मोठ्या भयंकर अशा दिवसाच्या यातनेची भीती आहे."

(दिव्य कुरआन, १० : १५)

३.१३ कोणत्याही परिस्थितीत तुमचे काम फक्त संदेश पोहोचविणे आहे.

"कोणत्याही परिस्थितीत तुमचे काम फक्त संदेश पोहोचविणेच होय आणि हिशेब घेणे आमचे काम होय. हे लोक पाहात नाहीत की आम्ही या भूमीवर चालून येत आहोत आणि हिचे वेटोळे सर्व बाजूंनी आवळत येत आहोत?"

(दिव्य कुरआन, १३ : ४०-४१)

३.१४ आम्ही प्रत्येक जनसमूहात एक पैगंबर पाठविला आहे.

"आम्ही प्रत्येक जनसमूहात एक पैगंबर पाठविला आणि त्याच्याद्वारे सर्वांना खबरदार करून टाकले की, अल्लाहची भक्ती करा आणि अनिर्बंध बनलेल्या (तागूत)च्या उपासनेपासून अलिप्त राहा." (दिव्य कुरआन, १६ : ३६)

३.१५ हे पैगंबर (स.) तुम्ही मृतांना ऐकवू शकत नाही.

"तुम्ही मृतांना ऐकवू शकत नाही व त्या बहिऱ्यांपर्यंतही आपली हाक पोहचवू शकत नाही जे पाठ फिरवून पळत सुटले आहेत आणि आंधळ्यांनाही मार्ग दाखवून भटकण्यापासून वाचवू शकत नाही. तुम्ही तर आपले म्हणणे त्यांनाच ऐकवू शकता जे आमच्या वचनांवर इमान धारण करतात आणि मग आज्ञाधारक बनतात."

(दिव्य कुरआन, २७ : ८०-८१)

३.१६ मुहम्मद (स.) अल्लाहचे पैगंबर आणि पैगंबर उपसंहारक (अंतिम पैगंबर) आहेत.

"(लोकहो!) मुहम्मद (स.) तुमच्या पुरुषांपैकी कोणाचे पिता नाहीत परंतु ते अल्लाहचे पैगंबर आणि अंतिम पैगंबर आहेत. आणि अल्लाह प्रत्येक वस्तूचे ज्ञान राखणारा आहे." (दिव्य कुरआन, ३३ : ४०)

३.१७ हे नबी (स.) आम्ही तुम्हाला साक्षीदार, खुशखबर देणारा व भय दाखविणारा म्हणून पाठविले आहे.

"हे नबी (स.)! आम्ही तुम्हाला पाठविले आहे साक्षीदार बनवून, शुभवार्ता देणारा आणि भय दाखविणारा बनवून. अल्लाहच्या अनुज्ञेने त्याच्याकडे आवाहन करणारा बनवून आणि प्रकाशमान दीप बनवून." (दिव्य कुरआन, ३३ : ४५-४६)

३.१८ हे पैगंबर (स.) आम्ही तुम्हाला अखिल मानवजातीसाठी खुशखबर देणारा व सावध करणारा बनवून पाठविले आहे.

"आणि (हे पैगंबर (स.)), आम्ही तुम्हाला अखिल मानवजातीसाठी शुभवार्ता देणारा आणि सावधान करणारा बनवून पाठविले आहे, परंतु बहुतेक लोक जाणत नाहीत." (दिव्य कुरआन, ३४ : २८)

३.१९ तुम्ही त्या लोकांना ऐकवू शकत नाही जे थडग्यात दफन आहेत.

"परंतु (हे पैगंबर (स.)) तुम्ही त्या लोकांना ऐकवू शकत नाही जे कबरीत दफन आहेत. तुम्ही तर केवळ सावध करणारे आहात आम्ही तुम्हाला सत्यानिशी पाठविले आहे. शुभवार्ता देणारा व सावधान करणारा बनवून आणि कोणताही लोकसमुदाय असा होऊन गेला नाही ज्यात कोणी सावध करणारा आला नाही."

(दिव्य कुरआन, ३५ : २२-२४)

३.२० निःसंशय तुम्ही पैगंबरांपैकी आहात.

"शपथ आहे प्रबुद्ध कुरआनची की तुम्ही नि:संशय पैगंबरांपैकी आहात. सरळ मार्गावर आहात." (दिव्य कुरआन, ३६ : २-३)

३.२१ जो भटकेल त्याच्या भटकण्याचे अरिष्ट त्याच्यावरच येईल.

"आता जो सरळमार्गाचा अवलंब करील तो आपल्यासाठीच करील आणि जो भटकेल त्याच्या भटकण्याचे अरिष्ट त्याच्यावरच येईल. तुम्ही त्याचे जबाबदार नाही."

(दिव्य कुरआन, ३९ : ४१)

३.२२ अल्लाहने आपल्या पैगंबराला मार्गदर्शन व सत्य धर्मानिशी पाठविले आहे.

"तो अल्लाहच आहे ज्याने आपल्या पैगंबराला मार्गदर्शन आणि सत्य धर्मानिशी पाठविले आहे जेणेकरून सर्व धर्म प्रकारांवर त्याचे वर्चस्व बहाल करावे."

(दिव्य कुरआन, ४८ : २८)

३.२३ तुमचे काम यांच्याकडून जबरीने म्हणणे मान्य करविणे नाही.

"हे पैगंबर (स.), ज्या गोष्टी हे लोक बनवित आहेत, त्यांना आम्ही चांगलेच जाणतो. आणि तुमचे काम यांच्याकडून जबरीने म्हणणे मान्य करविणे नव्हे. फक्त तुम्ही या कुरआनद्वारे त्या प्रत्येक माणसाला उपदेश करा जो माझ्या ताकिदीला भीत असेल."

(दिव्य कुरआन, ५० : ४५)

३.२४ ही एक तंबी आहे पूर्वी आलेल्या तंबीपैकी.

"ही एक ताकीद आहे पूर्वी आलेल्या ताकीदींपैकी. येणारी घटका जवळ येऊन ठेपली आहे. अल्लाहच्या शिवाय कोणीही तिला हटविणार नाही. आता काय याच त्या गोष्टी होत ज्यावर तुम्ही आश्चर्य व्यक्त करता? हसता आणि रडत नाही? आणि गाऊन-वाजवून त्यांना टाळता? नतमस्तक व्हा अल्लाहसमोर आणि त्याचीच भक्ती करा."

(दिव्य कुरआन, ५३ : ५६-६२)

४. सत्यमार्गातील संकटे व अडथळे

४.१ असे लोक स्वतःला सुधारणावादी म्हणवून इमानधारकांची थट्टा करतात.

"काही लोक असे आहेत जे सांगतात की आम्ही अल्लाहवर आणि अंतिम न्यायदिनावर श्रद्धा ठेवतो. वास्तविक ते इमानधारक नाहीत. ते अल्लाह आणि इमानधारकांची फसवणूक करू पाहत आहेत. वस्तुतः ते स्वतःचीच फसवणूक करीत आहेत. परंतु ते त्यांना जाणवत नाही. त्यांच्या हृदयात विकृती आहे जिला अल्लाहने अधिक वाढू दिली आहे. आणि जे काही खोटे ते बोलताहेत त्याबद्दल त्यांना यातनामय शिक्षा आहे. जेव्हा त्यांना सांगितले जाते की, पृथ्वीवर उपद्रव माजवू नका. तेव्हा म्हणतात की, "आम्ही तर सुधारणा करणारे आहोत!" सावधान! हेच लोक उपद्रवी आहेत परंतु त्यांना ते कळत नाही. आणि जेव्हा त्यांना सांगितले जाते की, "ज्याप्रमाणे इतरांनी इमान धारण केले त्याचप्रमाणे तुम्ही सुद्धा इमान धारण करा." तेव्हा ते म्हणतात, "काय, आम्ही मूर्खांसारखी श्रद्धा ठेवावी? सावधान! हेच लोक मुर्ख आहेत. परंतु त्यांना त्याचे ज्ञान नाही. जेव्हा ते इमानधारकांना भेटतात तेव्हा म्हणतात, "आम्हीही इमानधारक आहोत." पण जेव्हा ते आपल्या शैतानांना भेटतात तेव्हा म्हणतात, "आम्ही तर तुमच्याच बरोबर आहोत आणि या लोकांची थट्टा करीत आहोत." (दिव्य कुरआन, २ : ८-१४)

४.२ अल्लाहच्या प्रार्थना स्थळात त्याचे नामस्मरण करण्याची मनाई.

"आणि त्या व्यक्तीपेक्षा अधिक अत्याचारी कोण असेल जो अल्लाहच्या प्रार्थनास्थळामध्ये त्याचे नामस्मरण करण्यास प्रतिबंध करतो आणि त्या स्थळांना उध्वस्त करण्याचा प्रयत्न करतो? असे लोक त्या प्रार्थनागृहामध्ये पाय ठेवण्यासही पात्र नाहीत आणि जर कधी गेले तर त्यांनी भीतभीतच जावे. त्यांचा या नश्वर जीवनामध्येही धिक्कार आहे आणि पारलौकिक जीवनामध्येही त्यांना यातना आहेत."

(दिव्य कुरआन, २ : ११४)

४.३ असा मनुष्य सत्याचा वाईट शत्रू असतो.

"माणसामध्ये एखादा तर असा आहे की ऐहिक जीवनात ज्याच्या गोष्टी तुम्हाला मोहक वाटतात आणि आपल्या नेक नियतीवर तो वारंवार अल्लाहला साक्षी ठरवितो, परंतु वास्तविक पाहता तो सत्याचा अत्यंत वाईट शत्रु असतो. जेव्हा त्याला सत्ता प्राप्त

होते तेव्हा पृथ्वीतलावर त्याची सारी धावपळ केवळ याचकरिता असते की उपद्रव माजवावे, शेतीचा विध्वंस करावा व मानवजात नष्ट करावी.''

(दिव्य कुरआन, २ : २०४-२०५)

४.४ इमानचा मार्ग स्वीकारणाऱ्यांची टिंगल उडविणारे.

''ज्या लोकांनी नाकारण्याची पद्धत अवलंबिली त्यांच्यासाठी भौतिक जीवन अत्यंत प्रिय व मनाला आवडेल असे बनविलेले आहे. असे लोक इमानधारकांचा उपहास करतात. परंतु पुनरुत्थानाच्या दिवशी धर्मपरायण लोक त्यांच्या तुलनेने उच्च स्थानांवर असतील. उरली भौतिक जीवनाची उपजीविका त्या विषयी अल्लाहला अधिकार आहे की ज्याच्यासाठी इच्छिल त्याला अमाप देतो.''

(दिव्य कुरआन, २ : २१२)

४.५ हे लोक सकाळी इमान धारण करतात आणि संध्याकाळी त्याचा इन्कार करतात.

''ग्रंथधारकांपैकी एक गट म्हणतो की या पैगंबराला मानणाऱ्या लोकांवर जे काही अवतरले आहे, त्यावर सकाळी श्रद्धा ठेवा व संध्याकाळी ते नाकारा. कदाचित या युक्तीने हे लोक आपल्या श्रद्धेपासून परावृत्त होतील.'' (दिव्य कुरआन, ३ : ७२)

४.६ अल्लाहच्या मार्गापासून सरळ मार्गावर चालणाऱ्यास रोखणारे.

''सांगा, हे ग्रंथधारकांनो! तुम्ही अल्लाहच्या गोष्टी मान्य करण्यास का नकार देता? त्या कारवाया तुम्ही करीत आहात, अल्लाह सर्वकाही पाहत आहे. सांगा, हे ग्रंथधारकांनो! हे काय तुमचे वर्तन आहे की जो अल्लाहच्या गोष्टी मान्य करतो त्यालादेखील तुम्ही अल्लाहच्या मार्गापासून रोखता आणि इच्छिता की त्याने वाकड्या मार्गाचे अनुसरण करावे. वस्तुत: तुम्ही स्वत: (तो सरळमार्गी असण्याबद्दल) साक्षी आहात. तुमच्या कारवायांपासून अल्लाह अनभिज्ञ नाही.''

(दिव्य कुरआन, ३ : ९८-९९)

४.७ हे नबी (स.)! तुमच्या अगोदरही पैगंबरांचा उपहास केला गेला आहे.

''हे नबी (स.)! तुमच्याअगोदर देखील कित्येक पैगंबरांचा उपहास केला गेला आहे. परंतु त्या टवाळकी करणाऱ्या लोकांवर सरतेशेवटी तेच सत्य उलटल्याविना राहिले नाही ज्याचा उपहास ते करीत होते. यांना सांगा, जरा पृथ्वीतलावर फेरफटका

मारून पाहा. खोटे ठरविणाऱ्यांचा शेवट कसा झाला आहे.''

(दिव्य कुरआन, ६ : १०-११)

४.८ वस्तीतील मोठमोठ्या अपराध्यांचे कुटिल कारवायात गुंतून राहणारे.

''तो मनुष्य जो अगोदर मृत होता मग आम्ही त्याला जीवन दिले आणि त्याला प्रकाश प्रदान केला ज्याच्या उजेडात तो लोकांमध्ये जीवनाची वाटचाल करतो, तो त्या माणसासारखा होऊ शकतो काय जो अंध:कारात पडलेला असेल आणि कोणत्याही प्रकारे त्यातून बाहेर पडत नसेल? नाकारणाऱ्यांकरिता तर त्यांची कृत्ये अशाच प्रकारे आकर्षक बनविण्यात आली आहेत आणि अशाच प्रकारे आम्ही प्रत्येक वस्तीत तिच्या मोठमोठ्या अपराध्यांना गुंतविले आहे की तेथे त्यांनी आपल्या कुटिलतेचे जाळे पसरवावेत. खरे पाहता ते आपल्या कुटिलतेच्या जाळ्यांत स्वत:च गुरफटतात. परंतु त्यांना त्याचे भान नाही.'' (दिव्य कुरआन, ६ : १२२-१२३)

४.९ तो प्रसंग आठवा जेव्हा सत्यविरोधक कुटिल युक्त्या करीत होते.

''आणि तो प्रसंगदेखील आठवण्याजोगा आहे जेव्हा सत्य नाकारणारे तुझ्याविरुद्ध युक्त्या योजीत होते की, एक तर तुला कैद करावे अथवा ठार मारावे किंवा देशांतर करावे. ते आपल्या चाली खेळत होते आणि अल्लाह आपली चाल खेळत होता. निस:शय अल्लाह सर्वोत्तम चाल खेळणारा आहे.''

(दिव्य कुरआन, ८ : ३०)

४.१० सत्यविरोधक नेहमी करार भंग करणारे आहेत.

''खचितच अल्लाहजवळ जमिनीवर चालणाऱ्या निर्मितीपैकी सर्वात जास्त वाईट ते लोक आहेत ज्यांनी सत्य मानण्यास नकार दिला मग कोणत्याही प्रकारे ते स्वीकारण्यास ते तयार नाहीत. (विशेषत:) त्यांच्यापैकी ते लोक ज्यांच्याशी तू करार केला. मग ते प्रत्येक प्रसंगी तो भंग करतात आणि त्यांना जरा देखील अल्लाहच्या प्रकोपाचे भय वाटत नाही.'' (दिव्य कुरआन, ८ : ५५-५६)

४.११ ते तोंडानी तुम्हाला राजी करू पाहतात परंतु हृदये त्यांची नाकारतात.

"ते आपल्या संभाषणाने तुम्हाला प्रसन्न करू पाहतात. परंतु हृदये त्यांची नाकारतात व त्यांच्यापैकी बरेचजण अवज्ञाकारी आहेत." (दिव्य कुरआन, ९ : ८)

४.१२ जे नेहमी प्रतिज्ञा भंग करीत राहिले व ज्यांनी पैगंबर (स.) यांना देशातून काढून टाकण्याचा संकल्प केला होता.

"काय तुम्ही लढणार नाहीत अशा लोकांशी जे आपल्या प्रतिज्ञा भंग करीत राहिले आणि ज्यांनी पैगंबराला देशातून काढून टाकण्याचा निश्चय केला होता व अतिरेकास प्रारंभ करणारे तेच होते? तुम्ही त्यांना भिता काय? जर तुम्ही इमानधारक असाल तर अल्लाह या गोष्टीला जास्त पात्र आहे की तुम्ही त्याची भीती बाळगावी."

(दिव्य कुरआन, ९ : १३)

४.१३ तुमचे भले झाले तर या विरोधकांना दुःख होते व तुम्हांवर एखादे संकट येते तेव्हा हे तोंड फिरवून खुश होऊन परततात व म्हणत जातात की बरे झाले.

"तुमचे भले झाले तर यांना दु:ख होते व तुम्हांवर एखादे संकट येते तेव्हा ते तोंड फिरवून खुश होऊन परततात व म्हणत जातात की बरे झाले. आम्ही अगोदरच आमचा मामला ठीकठाक केला होता. यांना सांगा, "आम्हाला कदापि काहीही (चांगले वाईट) पोहचत नाही. परंतु ते जे अल्लाहने आमच्यासाठी लिहिले आहे अल्लाहच आमचा वाली आहे." (दिव्य कुरआन, ९ : ५०-५१)

४.१४ पैगंबर (स.) यांना भूमीवरून त्यांचे पाय उखडून टाकण्याचा प्रयत्न करणारे.

"हे पैगंबर (स.) या लोकांनी या प्रयत्नांत कोणतीही उणीव राहू दिली नाही की तुम्हाला उपद्रवात टाकून त्या दिव्य प्रकटनापासून परावृत्त करावे जो आम्ही तुमच्याकडे पाठविला आहे. जेणेकरून तुम्ही आमच्या नावाने स्वत:कडून एखादी गोष्ट रचावी. जर तुम्ही असे केले असते तर त्यांनी जरूर तुम्हाला आपले मित्र बनविले असते."

(दिव्य कुरआन, १७ : ७३)

४.१५ हे सत्यविरोधक जेव्हा तुम्हाला पाहतात तेव्हा तुम्हाला थट्टेचा विषय बनवितात.

"हे सत्याचा इन्कार करणारे जेव्हा तुम्हाला पाहतात तेव्हा तुम्हाला थट्टेचा विषय बनवितात. म्हणतात, "हा आहे का तो इसम जो तुमच्या उपास्यांचा उल्लेख करीत असतो?" आणि त्यांची स्वत:ची स्थिती अशी आहे की ते कृपावंताच्या स्मरणास नकार देतात." (दिव्य कुरआन, २१ : ३६)

४.१६ गुन्हेगार व अपराधी प्रत्येक पैगंबराचे शत्रू राहिले आहेत.

"हे पैगंबर (स.) आम्ही तर अशाच प्रकारे गुन्हेगारांना प्रत्येक पैगंबराचे शत्रू बनविले आहे आणि तुमच्यासाठी तुमचा पालनकर्ता मार्गदर्शनासाठी व साहाय्यासाठी पुरेसा आहे." (दिव्य कुरआन, २५ : ३१)

४.१७ हे लोक जेव्हा तुम्हाला पाहतात तेव्हा तुमची कुचेष्टा करतात.

"हे लोक जेव्हा तुम्हाला पाहतात तेव्हा तुमची कुचेष्टा करतात, (म्हणतात) "हाच का तो ज्याला अल्लाहने पैगंबर बनवून पाठविले आहे? याने तर आम्हाला पथभ्रष्ट करून आमच्या उपास्यांपासून पराङ्मुख केले असते जर आम्ही त्यांच्यावरील श्रद्धेवर ठाम राहिलो नसतो." ती घटका दूर नाही जेव्हा प्रकोपा पाहून यांना खुद्द कळून येईल की कोण पथभ्रष्टतेत दूर भरकटला गेला होता."

(दिव्य कुरआन, २५ : ४१-४२)

४.१८ मनाला दुःख देणारे व बोचणारे त्यांचे डावपेच.

"हे पैगंबर (स.)! यांच्या दशेवर दु:ख करू नका आणि यांच्या डावपेचावर कष्टीही होऊ नका." (दिव्य कुरआन, २७ : ७०)

४.१९ लोकांची दिशाभूल करण्यासाठी कुचेष्टा करणारे.

"आणि माणसांपैकी कोणी असाही आहे की मनमोहक कथा खरेदी करून आणतो. जेणेकरून लोकांना अल्लाहच्या मार्गापासून ज्ञानाविना भटकवावे आणि या मार्गाचे आवाहन चेष्टेत उडवावे. अशा लोकांसाठी भयंकर अपमानजनक शिक्षा आहे."

(दिव्य कुरआन, ३१ : ६)

४.२० दांभिक लोकांकडून यातना पोहोचविल्या जाणे.

"आणि कदापि दबू नका नाकारणाऱ्यांशी (काफिरांशी) व दांभिकांशी, काही पर्वा करू नका त्यांच्या यातनेची आणि विश्वास ठेवा अल्लाहवर. अल्लाहच याकरिता पुरेसा आहे की माणसाने आपले मामले त्याच्या स्वाधीन करावे."

(दिव्य कुरआन, ३३ : ४८)

४.२१ स्पष्ट प्रमाण, ग्रंथ व उज्वल आदेश लाभल्यानंतरही खोटे ठरविणे.

"आता जर हे लोक तुम्हाला खोटे लेखत असतील, तर यांच्यापूर्वी होऊन गेलेल्या लोकांनीदेखील खोटे लेखले आहे. त्यांच्यापाशी त्यांचे पैगंबर, स्पष्ट प्रमाण, संदेश आणि उज्वल आदेश करणारा ग्रंथ घेऊन आले होते. मग ज्या लोकांनी मान्य केले नाही त्यांना मी पकडले आणि पाहून घ्या माझी शिक्षा किती कठोर होती."

(दिव्य कुरआन, ३५ : २५-२६)

४.२२ ते म्हणत, "आम्ही एका वेड्या कवीसाठी आमच्या ईश्वरांना सोडावे का?"

"हे ते लोक होते की जेव्हा यांना म्हटले जात असे, "अल्लाहशिवाय कोणी खरा उपास्य नाही." तर ते घमेंडीत येत असत आणि म्हणत असत, "आम्ही एका वेड्या कवीसाठी आमच्या ईश्वरांना सोडून द्यावे?" वस्तुत: तो सत्यानिशि आला होता आणि त्याने पैगंबरांची सत्यता प्रमाणित केली होती." (दिव्य कुरआन, ३७ : ३४-३७)

४.२३ इन्कार करणारे म्हणू लागले, "हा जादूगार आहे, अत्यंत खोटा आहे."

"या लोकांना या गोष्टीचे मोठे आश्चर्य वाटते की एक भय दाखविणारा खुद्द यांच्यातूनच आला, इन्कार करणारे म्हणू लागले की, हा जादूगार आहे, अत्यंत खोटा आहे, याने साऱ्या ईश्वरांऐवजी केवळ एकच ईश्वर बनविला काय? ही तर फार आश्चर्यकारक गोष्ट आहे." (दिव्य कुरआन, ३८ : ४-५)

४.२४ कोणतीही सनद नसतांना विवाद व तंटे घालणारे.

"अशाच प्रकारे अल्लाह त्या सर्व लोकांना पथभ्रष्टतेत टाकतो जे मर्यादा उल्लंघन करणारे आणि शंकाखोर असतात, आणि अल्लाहच्या संकेतात तंटे करतात याविना की त्यांच्याकडे एखादे प्रमाण अथवा सनद आलेली नसतानाही. हे वर्तन अल्लाह आणि इमानधारकांजवळ अत्यंत वाईट आहे. अशाच प्रकारे अल्लाह प्रत्येक गर्विष्ठ आणि कठोर व्यक्तीची हृदये मोहोरबंद करतो."

(दिव्य कुरआन, ४० : ३४-३५)

४.२५ लोकांना कुरआन ऐकता येऊ नये म्हणून व्यत्यय आणणारे.

"हे सत्याचा इन्कार करणारे म्हणतात, या कुरआनला कदापि ऐकू नका आणि जेव्हा हा ऐकविला जाईल तेव्हा त्यात व्यत्यय आणा, कदाचित अशा प्रकारे तुम्ही वर्चस्व मिळवाल." (दिव्य कुरआन, ४१ : २६)

४.२६ दांभिकांचे परस्परात कानगोष्टी करणे, वाईट चिंतणे.

"काय तुम्ही पाहिले नाही, त्या लोकांना ज्यांना कानगोष्टी करण्याची मनाई केली गेली होती. तरीसुद्धा ते तेच कृत्य करीत जात आहेत, ज्याची त्यांना मनाई केली गेली होती? हे लोक लपून छपून आपापसांत गुन्हा आणि आगळिकी व पैगंबराच्या अवज्ञेच्या गोष्टी करतात." (दिव्य कुरआन, ५८ : ८)

४.२७ क्रोधाने पाहातात व वेडा म्हणतात.

"जेव्हा हे नाकारणारे (काफिर) लोक उपदेशवाणी (कुरआन) ऐकतात तेव्हा तुम्हाला अशा दृष्टीने पाहतात जणू काय ते तुमचे पाय उखडून टाकतील आणि म्हणतात की हा निश्चितच वेडा आहे. वास्तविकत: हा तर सर्व जगवासियांसाठी एक उपदेश आहे." (दिव्य कुरआन, ६८ : ५१-५२)

४.२८ एका दासाला नमाज पढण्यास मनाई करने.

"तुम्ही पाहिले त्या माणसाला जो एका दासाला मनाई करतो जेव्हा तो नमाज पढत असतो? तुमचा काय विचार आहे जर तो सरळ मार्गावर असता किंवा ईशपरायणतेचा आदेश देत असता? तुमचा काय विचार आहे जर (हा मनाई करणारा माणूस सत्याला) खोटे लेखत आहे व विमुख होत आहे? काय त्याला माहीत नाही की अल्लाह पहात आहे?" (दिव्य कुरआन, ९६ : ९-१४)

५. पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावरील इमान

५.१ पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर इमान न राखणारे बहिरे, मुके आणि आंधळे आहेत.

"हे बहिरे, मुके आणि आंधळे आहेत. तेव्हा हे मागे परतणार नाहीत. किंवा (यांचे उदाहरण असे आहे की) आकाशातून पर्जन्याचा वर्षाव होत आहे. त्याचबरोबर अंधार, कडकडाट आणि लखलखाट होत आहे. विजेचा कडकडाट ऐकून जीवाच्या भीतीने कानात बोटे खुपसून घेत आहेत. आणि अल्लाहने या सत्य नाकारणाऱ्यांना (चोहिकडून) वेढले आहे."

(दिव्य कुरआन, २ : १८-१९)

५.२ ग्रंथधारकांपैकी एका गटाने पैगंबर (स.) यांना अमान्य करून स्वतःच्या ग्रंथालाच खोटे ठरविले.

"स्मरण करा, अल्लाहने पैगंबरांकडून वचन घेतले होते की, आज मी तुम्हाला ग्रंथ, विवेक व बुद्धीमत्तेने उपकृत केले आहे. उद्या जर दुसरा पैगंबर तुमच्याजवळ त्याचा शिकवणीची ग्वाही देणारा आला जी शिकवण अगोदरपासूनच तुमच्याजवळ आहे तर तुम्हाला त्याच्यावर इमान राखावे लागेल आणि त्याला सहकार्य द्यावे लागेल."

(दिव्य कुरआन, ३ : ८१)

५.३ खरे इमानधारक सर्व पैगंबरांवर श्रद्धा ठेवतात.

"हे पैगंबर (स.) सांगा की, आम्ही अल्लाहला मानतो, त्या शिकवणींना मानतो जी आम्हांवर उतरली आहे. त्या शिकवणीला देखील मान्य करतो ज्या इब्राहीम (अ.) इस्माईल (अ.) इसहाक (अ.) याकुब (अ.) आणि याकुब (अ.) यांच्या संततीवर उतरल्या होत्या आणि त्या आदेशांवर देखील इमान धारण करतो. जे मुसा (अ.) व इसा (अ.) आणि इतर पैगंबरांना त्यांच्या पालनकर्त्याकडून दिले गेले. आम्ही त्यांच्यापैकी एकाच्यामध्ये भेदभाव करीत नाही आणि आम्ही अल्लाहच्या आदेशांच्या अधीन (मुस्लिम) आहोत."

(दिव्य कुरआन, ३ : ८४)

५.४ पैगंबर (स.) यांना अल्लाहचे पैगंबर मान्य करूनही त्यांच्यावर इमान न राखणाऱ्यांना मार्गदर्शन मिळत नाही.

"कसे शक्य आहे की, अल्लाह त्या लोकांना मार्गदर्शन प्रदान करील ज्यांनी इमानची देणगी मिळाल्यानंतर पुन्हा द्रोहाचा अंगिकार केला. वास्तविक पाहता त्यांनी

स्वत: या गोष्टींची ग्वाही दिलेली आहे की हा पैगंबर सत्याधिष्ठित आहे. आणि त्या लोकांपर्यंत उज्वल संकेतवचनेदेखील पोहोचली आहेत. अल्लाह तर अत्याचाऱ्यांना मार्गदर्शन करीत नसतो.'' (दिव्य कुरआन, ३ : ८६)

५.५ ग्रंथधारकांनी इमान राखले असते तर त्यांच्यासाठी चांगले झाले असते.

''या ग्रंथधारकांनी इमान धारण केले असते तर ते त्यांच्याकरिता उत्तम होते.'' (दिव्य कुरआन, ३ : ११०)

५.६ ज्यांनी पैगंबर (स.) यांच्यावर इमान धारण केले नाही व त्यांची अवज्ञा केली.

''तेव्हा ते सर्वजण ज्यांनी पैगंबरांचे म्हणणे ऐकले नाही आणि त्यांची अवज्ञा करीत राहिले, इच्छा करतील की पृथ्वीने तिच्या उदरात आम्हांस सामावून घेतले तर किती छान! तेथे ते आपली कोणतीही गोष्ट अल्लाहपासून लपवू शकणार नाहीत.'' (दिव्य कुरआन, ४ : ४२)

५.७ जो कोणी पैगंबर (स.) यांचा विरोध करील तो नरकामध्ये झोकला जाईल.

''परंतु जो कोणी पैगंबराच्या विरोधात कंबर कसेल आणि इमानधारकांचे मार्गानुकरण करण्याऐवजी इतर मार्गाचे अनुसरण करील तेही अशा परिस्थितीत की त्याच्यावर सरळमार्ग स्पष्ट झाला असेल तर त्याला आम्ही त्याच मार्गावर चालवू जिकडे तो स्वत: वळला आणि त्याला नरकामध्ये झोकून देऊ जे अत्यंत वाईट ठिकाण आहे.'' (दिव्य कुरआन, ४ : ११५)

५.८ जे लोक पैगंबरांच्या दरम्यान भेदभाव करतात ते पक्के नाकारणारे (काफिर) आहेत.

''जे लोक अल्लाह आणि त्याच्या पैगंबरांशी द्रोह करतात आणि इच्छितात की अल्लाह आणि त्याच्या पैगंबरांच्या दरम्यान भेदभाव करावा आणि म्हणतात की आम्ही काहींना मान्य करू आणि काहींना मानणार नाही व इमान व कुफ्र यांच्या दरम्यानातून एक मार्ग काढण्याचा निश्चय करतात, ते सर्व पक्के अश्रद्धावंत (काफीर) आहेत.'' (दिव्य कुरआन, ४ : १५०-१५१)

५.९ जे लोक अल्लाह व त्याच्या सर्व पैगंबरांना मानतील, त्यांनाच मोबदला मिळणार आहे.

"आणि अशा काफिरांसाठी आम्ही अशी शिक्षा तयार करून ठेवली आहे जी त्यांना अपमानित व तिरस्करणीय करून सोडणारी असेल. याविरुद्ध जे लोक अल्लाह आणि त्याच्या सर्व पैगंबरांना मानतील आणि त्यांच्या दरम्यान फरक करणार नाहीत, त्यांना आम्ही अवश्य त्यांचा मोबदला प्रदान करू आणि अल्लाह मोठा क्षमा करणारा व दया करणारा आहे." (दिव्य कुरआन, ४ : १५१-१५२)

५.१० लोकहो! पैगंबर (स.) अल्लाहकडून सत्य घेऊन आलेले आहेत. त्यांच्यावर तुम्ही इमान धारण करा.

"लोकहो! हा पैगंबर तुमच्याजवळ तुमच्या पालनकर्त्याकडून सत्य घेऊन आला आहे. इमान धारण करा, तुमच्यासाठीच उत्तम आहे आणि नकार देत असाल (कुफ्र) तर लक्षात ठेवा आकाशात व पृथ्वीत जे काही आहे ते सर्व अल्लाहचे आहे आणि अल्लाह सर्वज्ञ देखील आहे व बुद्धिमानसुद्धा." (दिव्य कुरआन, ४ : १७०)

५.११ सुस्पष्ट शिकवणींसह आलेल्या पैगंबर (स.) यांना नाकारण्याचा ग्रंथधारकांना निमित्त उरलेले नाही.

"हे ग्रंथधारकांनो! आमचा हा पैगंबर अशावेळी तुमच्यापाशी आला आहे आणि धर्माची अशी सुस्पष्ट शिकवण तुम्हाला देत आहे जेव्हा पैगंबरांच्या आगमनाचा क्रम एका दीर्घ काळापासून बंद होता. ते अशाकरिता की तुम्ही असे सांगू नये की आमच्यापाशी कोणी शुभवार्ता देणारा आणि भय दाखविणारा आला नाही. तर पाहा आता तो शुभवार्ता देणारा व भय दाखविणारा आला आहे आणि अल्लाह प्रत्येक वस्तूवर प्रभुत्वसंपन्न आहे." (दिव्य कुरआन, ५ : १९)

५.१२ ग्रंथधारक, पैगंबर (स.) यांची सत्यता तशाच प्रकारे ओळखतात. जसे स्वतःच्या पुत्रास ओळखतात.

"ज्या लोकांना आम्ही ग्रंथ दिला आहे ते या गोष्टीला अशा प्रकारे निःसंदिग्धपणे ओळखतात जशी त्यांना आपल्या पुत्रांना ओळखण्यात यत्किंचितही शंका वाटत नाही. परंतु ज्यांनी आपण होऊन स्वतःला नुकसानीत टाकले आहे ते हे मान्य करीत नाहीत." (दिव्य कुरआन, ६ : २०)

५.१३ तौरात आणि इंजील (जूना व नवा करार) मध्ये ज्या निरक्षर पैगंबराचा उल्लेख आला आहे ते म्हणजे मुहम्मद (स.) आहेत.

"(म्हणून आज ही कृपा त्या लोकांचा वाटा आहे) जे या निरक्षर पैगंबर (स.) चे अनुयायित्व पत्करतील ज्याचा उल्लेख त्यांना त्यांच्या तौरात व इंजीलमध्ये लिखित स्वरूपात आढळतो. तो त्यांना सदाचाराची आज्ञा देतो, दुराचारापासून रोखतो. त्यांच्यासाठी स्वच्छ वस्तू हलाल करतो व अस्वच्छ वस्तू हराम करतो. आणि त्यांच्यावरून ते ओझे उतरवितो जे त्यांच्यावर लादलेले होते आणि ती बंधने सोडतो ज्यामध्ये ते जखडलेले होते. म्हणून जे लोक याच्यावर इमान धारण करतील आणि याचे समर्थन व साहाय्य करतील व त्या प्रकाशाचे अनुसरण करतील जो याच्याबरोबर अवतरला गेला आहे, तेच सफल होणारे आहेत." (दिव्य कुरआन, ७ : १५७)

५.१४ पैगंबर (स.) यांचा इन्कार करणाऱ्यांस क्षमा मिळणार नाही.

"अल्लाह या थट्टा उडविणाऱ्यांचा उपहास करतो व त्यांच्यासाठी यातनादायक शिक्षा आहे. हे पैगंबर (स.) मग तुम्ही अशा लोकांसाठी क्षमेची याचना करा अथवा न करा. जर तुम्ही सत्तर वेळा देखील त्यांना क्षमा करण्याची विनवणी कराल तरी अल्लाह त्यांना कदापि क्षमा करणार नाही. कारण त्यांनी अल्लाह आणि त्याच्या पैगंबरांशी द्रोह केला आहे आणि अल्लाह अवज्ञाकारी लोकांना मुक्तिमार्ग दाखवित नसतो."

(दिव्य कुरआन, ९ : ७९-८०)

५.१५ पैगंबरांचा विरोध करणाऱ्यांचे सर्व केले सवरलेले वाया जाणार आहे.

"ज्या लोकांनी द्रोह (कुफ्र) केला आणि अल्लाहच्या मार्गापासून रोखले व पैगंबराबरोबर भांडण केले जेव्हा की त्यांच्यावर सरळमार्ग स्पष्ट झाला होता, वस्तुतः ते अल्लाहची कोणतीही हानी करू शकत नाहीत तर अल्लाहच त्यांचे सर्व केले सवरलेले नष्ट करील." (दिव्य कुरआन, ४७ : ३२)

५.१६ जे लोक पैगंबरावर इमान धारण करणार नाहीत, त्यांच्यासाठी भडकता नरकाग्नी तयार ठेवलेला आहे.

"अल्लाह व त्याच्या पैगंबरावर जे लोक इमान धारण करणार नसतील अशा अश्रद्धावंतांसाठी (काफिरांसाठी) आम्ही भडकत असलेला अग्नी तयार ठेवला आहे."

(दिव्य कुरआन, ४८ : १३)

५.१७ पैगंबर (स.) यांच्यावर श्रद्धा (इमान) ठेवणाऱ्यांसाठी द्विगुणित मोबदला आहे.

"हे लोकहो! ज्यानी इमान धारण केले आहे, अल्लाहच्या प्रकोपाचे भय बाळगा आणि त्याचे पैगंबर (स.) यांच्यावर इमान धारण करा, अल्लाह तुम्हाला आपल्या कृपेचा दुहेरी वाटा प्रदान करील आणि तुम्हाला असे तेज प्रदान करील ज्याचा प्रकाशात तुम्ही चालाल आणि तुमचे अपराध माफ करील. अल्लाह मोठा क्षमा करणारा आणि मेहरबान आहे."

(दिव्य कुरआन, ५७ : २८)

५.१८ पैगंबर (स.) यांचा विरोध करणारे तोंडघशी पडणार आहेत.

"आणि नाकारणाऱ्यांसाठी (काफिर) यातनादायक शिक्षा आहे. जे लोक अल्लाह आणि त्याच्या पैगंबराचा विरोध करतात ते त्याचप्रकारे अपमानित व फटफजित (तोंडघशी) केले जातील ज्याप्रकारे त्यांच्या पूर्वीचे लोक अपमानित व फटफजित केले गेले आहेत."

(दिव्य कुरआन, ५८ : ४-५)

५.१९ इमान धारण करा अल्लाहवर आणि त्याचे पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर.

"तर इमान धारण करा अल्लाहवर आणि त्याच्या पैगंबरावर आणि त्या प्रकाशावर जो आम्ही अवतरला आहे. जे काही तुम्ही करता अल्लाह त्याची खबर राखणारा आहे."

(दिव्य कुरआन, ६४ : ८)

६. पैगंबर मुहम्मद (स.) यांचे आज्ञापालन

६.१ पैगंबर (स.) यांचे अनुकरण, अल्लाहवर प्रेम असल्याचे प्रतीक आहे.

"हे पैगंबर (स.)! लोकांना सांगून टाका, जर तुम्ही खरोखर अल्लाहवर प्रेम करीत असाल, तर माझे अनुकरण करा, अल्लाह तुमच्यावर प्रेम करील आणि तुमच्या अपराधांना क्षमा करील. तो अत्यंत क्षमाशील व परमकृपाळू आहे."

(दिव्य कुरआन, ३ : ३१)

६.२ त्यांना सांगा, अल्लाहचे व पैगंबराचे आज्ञाधारक बना.

"त्यांना सांगा, "अल्लाह व पैगंबरांचे आज्ञाधारक बना." मग जर त्यांनी तुमचे आवाहन स्वीकारले नाही तर अल्लाह अवज्ञा करणाऱ्यांवर प्रेम करत नाही."

(दिव्य कुरआन, ३ : ३२)

६.३ अल्लाह व त्याच्या पैगंबराच्या आज्ञा पाळणाऱ्यांसाठी मोठे यश आहे.

"या अल्लाहने ठरवून दिलेल्या मर्यादा आहेत. जो अल्लाह व त्याच्या पैगंबरांचे आज्ञापालन करील त्याला अल्लाह अशा उपवनांत दाखल करील ज्यांच्या खालून कालवे वाहत असतील आणि त्या उद्यानात तो सदैव राहील आणि हे तर मोठे यश आहे."

(दिव्य कुरआन, ४ : १३)

६.४ पैगंबराची जो अवज्ञा करील त्याच्यासाठी अपमानकारक शिक्षा आहे.

"आणि जो अल्लाह व त्याच्या पैगंबराची अवज्ञा करील आणि त्याने ठरविलेल्या मर्यादांचे उल्लंघन करील त्याला अल्लाह आगीत टाकील ज्याच्यात तो सदैव राहील आणि त्याच्यासाठी अपमानकारक शिक्षा आहे."

(दिव्य कुरआन, ४ : १४)

६.५ पैगंबर (स.) यांची अवज्ञा करणाऱ्यांना परलोकात मोठा पश्चाताप करावा लागेल.

"तेव्हा ते सर्वजण ज्यांनी पैगंबराचे म्हणणे ऐकले नाही आणि त्यांची अवज्ञा करीत राहिले, इच्छा करतील की पृथ्वीने तिच्या उदरात आम्हांस सामावून घेतले तर

किती छान! तेथे हे आपली कोणतीही गोष्ट अल्लाहपासून लपवू शकणार नाहीत.''

(दिव्य कुरआन, ४ : ४२)

६.६ इमानधारकांनो! अल्लाहचे व पैगंबरांचे आज्ञापालन करा.

''हे इमानधारकांनो! आज्ञापालन करा अल्लाहचे, आज्ञापालन करा पैगंबराचे आणि त्या लोकांचे जे तुमच्यापैकी आज्ञाकारी असतील. मग जर तुमच्या दरम्यान एखाद्या बाबतीत वाद निर्माण झाला तर त्याला अल्लाह व पैगंबराकडे रूजू करा. जर तुम्ही खरोखरच अल्लाह व अंतिम दिनावर इमान राखत असाल. हीच एक योग्य कार्यपद्धती आहे आणि शेवटाच्या दृष्टीने देखील अधिक चांगली आहे.''

(दिव्य कुरआन, ४ : ५९)

६.७ प्रत्येक पैगंबर यासाठीच पाठविला आहे की अल्लाहच्या आदेशाने त्याच्या आज्ञा पाळल्या जाव्यात.

''(यांना सांगा की) आम्ही जो कोणी पैगंबर पाठविला आहे, याकरिताच पाठविला की अल्लाहच्या आदेशांच्या आधारावर त्याची आज्ञा पाळली जावी.''

(दिव्य कुरआन, ४ : ६४)

६.८ मनात या किंचितही संकोच न बाळगता सर्व मामल्यात पैगंबरांचे निर्णय मान्य करणे.

''हे मुहम्मद (स.)! तुमच्या पालनकर्त्याची शपथ, हे कधीही इमानधारक होऊ शकत नाहीत जोपर्यंत आपल्या वादग्रस्त प्रश्नात हे तुम्हाला निर्णय देणारा मान्य करीत नाहीत. मग जो काही निर्णय तुम्ही द्याल त्यावर आपल्या मनांतदेखील काही संकोच वाटू नये तर पूर्णतः मान्य करावे.'' (दिव्य कुरआन, ४ : ६५)

६.९ अल्लाह व पैगंबरांच्या आज्ञा पाळणारे लोक नबी, सत्यनिष्ठ, शहीद व सदाचारी सोबत असतील.

''जे लोक अल्लाह आणि अल्लाहच्या पैगंबरांचे आज्ञापालन करणारे लोक त्यांच्या समवेत असतील ज्यांना अल्लाहने आपल्या कृपाप्रसादाने अनुग्रहित केले आहे. अर्थात नबी (पैगंबर), सत्यवचनी, शहीद व सदाचारी लोक आणि किती चांगले मित्र आहेत! ही वास्तविक कृपा आहे जी अल्लाहकडून प्रदान होते आणि वास्तविकता समजण्याकरिता केवळ अल्लाहचे ज्ञानच पुरेसे आहे.''

(दिव्य कुरआन, ४ : ६९-७०)

६.१० ज्याने पैगंबराची आज्ञा पाळली त्याने अल्लाहची आज्ञा पाळली.

"हे मुहम्मद (स.), आम्ही तुम्हाला लोकांसाठी पैगंबर बनवून पाठविले आहे आणि यासाठी अल्लाहची साक्ष पुरेशी आहे. ज्याने पैगंबराची आज्ञा पाळली त्याने खरे म्हणजे अल्लाहचे आज्ञापालन केले आणि जो पराङ्मुख झाला तर आम्ही तुम्हाला त्या लोकांवर पहारेकरी म्हणून तर पाठविले नाही." (दिव्य कुरआन, ४ : ७९-८०)

६.११ अल्लाह आणि त्याच्या पैगंबरांचे आज्ञापालन करा व अवज्ञा करू नका.

"अल्लाह व त्याच्या पैगंबराचे म्हणणे मान्य करा आणि अलिप्त राहा, परंतु जर तुम्ही अवज्ञा केली तर हे समजून असा की आमच्या पैगंबरावर स्पष्टपणे आदेश पोहचविण्याची फक्त जबाबदारी होती." (दिव्य कुरआन, ५ : ९२)

६.१२ सरळमार्ग प्राप्त करण्यासाठी लोकांनी पैगंबर मुहम्मद (स.) यांचे अनुकरण करावे.

"त्याच्याशिवाय इतर कोणीही ईश्वर नाही, तोच जीवन प्रदान करतो व तोच मृत्यू देतो, म्हणून इमान धारण करा अल्लाहवर आणि त्याने पाठविलेल्या निरक्षर नबी (स.) वर जो अल्लाह व त्याच्या आदेशांना मानतो आणि अनुसरण करा त्याचे जेणेकरून तुम्ही सरळमार्ग प्राप्त कराल." (दिव्य कुरआन, ७ : १५८)

६.१३ खरे इमानधारक अल्लाह व त्याच्या पैगंबराच्या आज्ञा पाळतात.

"म्हणून तुम्ही अल्लाहचे भय बाळगा व आपापसातील संबंध सुधारा आणि अल्लाह व त्याच्या पैगंबराची आज्ञा पाळा, जर तुम्ही इमानधारक असाल. खरे इमानधारक तर तेच लोक होत ज्यांची हृदये अल्लाहचा उल्लेख ऐकताच थरारून जातात आणि जेव्हा त्यांच्यासमोर अल्लाहच्या वचनांचे पठण होते तेव्हा त्यांची श्रद्धा अधिकच वाढत जाते." (दिव्य कुरआन, ८ : १-२)

६.१४ मुस्लिमांनो! अल्लाह व त्याच्या पैगंबराचे आज्ञापालन करा आणि त्या लोकांप्रमाणे बनू नका.

"हे इमानधारकांनो! अल्लाह आणि त्याच्या पैगंबराचे आज्ञापालन करा. आणि आज्ञा ऐकल्यानंतर तिच्यापासून पराङ्मुख होऊ नका. त्या लोकांसमान होऊ नका ज्यांनी म्हटले की आम्ही ऐकले; वास्तविक ते काही ऐकत नाहीत."

(दिव्य कुरआन, ८ : २०-२१)

६.१५ अल्लाह आणि त्याच्या पैगंबराच्या हाकेला होकार द्या.

"हे इमानधारकांनो! तुम्ही अल्लाह आणि त्याच्या पैगंबराच्या हाकेला प्रतिसाद द्या जेव्हा की पैगंबराने तुम्हाला अशा गोष्टीकडे बोलवावे जी तुम्हाला जीवन प्रदान करणारी असेल." (दिव्य कुरआन, ८ : २४)

६.१६ अल्लाह आणि त्याच्या पैगंबराच्या आज्ञा पाळा व आपसात भांडू नका.

"अल्लाह आणि त्याच्या पैगंबराच्या आज्ञा पाळा व आपसांत भांडू नका नाहीतर तुमच्यात दुर्बलता येईल व तुमचा वचक नाहीसा होईल."

(दिव्य कुरआन, ८ : ४६)

६.१७ अल्लाह व पैगंबर याचे अधिक हक्कदार आहेत की त्यांना प्रसन्न केले जावे.

"हे लोक तुमच्यासमोर शपथा घेतात जेणेकरून तुम्हाला प्रसन्न करावे, वास्तविक पाहता हे जर इमानधारक आहेत तर अल्लाह आणि पैगंबर या गोष्टीचे जास्त हक्कदार आहेत की यांनी त्यांना प्रसन्न करण्याची काळजी घ्यावी. यांना माहीत नाही की जो अल्लाह व त्याच्या पैगंबराचा मुकाबला करतो त्याच्यासाठी नरकाची आग आहे ज्यात तो सदैव राहील. ही फार मोठी नामुष्की आहे."

(दिव्य कुरआन, ९ : ६२-६३)

६.१८ इमानधारक पुरुष व स्त्रिया अल्लाह व त्याच्या पैगंबराचे आज्ञांकित असतात.

"इमानधारक पुरुष व इमानधारक स्त्रिया हे सर्व एक दुसऱ्याचे मित्र आहेत, भलेपणाचा आदेश देतात व वाईट गोष्टींपासून रोखतात, नमाज कायम करतात, जकात देतात आणि अल्लाह व त्याच्या पैगंबरांचे आज्ञाधारक आहेत. हे ते लोक आहेत ज्याच्यावर अल्लाहचा कृपावर्षाव होणारच." (दिव्य कुरआन, ९ : ७१)

६.१९ इमानधारक लोकच खरेतर यशस्वी आहेत.

"असले लोक मुळीच इमानधारक नाहीत. जेव्हा त्यांना बोलाविले जाते अल्लाह आणि पैगंबराकडे जेणेकरून पैगंबराने त्यांच्या परस्परातील तंट्याचा निकाल लावावा, तेव्हा यांच्यापैकी एक पक्ष त्याला बगल देतो. तथापि सत्य जर त्यांना

अनुकूल असेल तर मोठे आज्ञाधारक बनून पैगंबराकडे येतात. काय यांच्या हृदयाला (दांभिकतेचा) रोग जडलेला आहे? अथवा हे शंकेत गुरफटलेले आहेत? किंवा या लोकांना अशी भीती आहे की अल्लाह व त्याचा पैगंबर त्यांच्यावर अत्याचार करील? खरी गोष्ट अशी आहे की अत्याचारी तर हे लोक स्वत:च आहेत. इमानधारकांचे कर्तव्य तर असे आहे की जेव्हा त्यांना अल्लाह व पैगंबर (स.) कडे बोलाविले जाईल की पैगंबर त्यांच्या प्रकरणात निकाल देतील तेव्हा त्यांनी सांगावे की आम्ही ऐकले व आज्ञा पाळली. असेलच लोक सफलता प्राप्त करणारे आहेत आणि यशस्वी तेच आहेत जे अल्लाह आणि पैगंबरांचे आज्ञापालन करतील आणि अल्लाहचे भय बाळगतील व त्याच्या अवज्ञेपासून स्वत:ला वाचवतील.'' (दिव्य कुरआन, २४ : ४७-५२)

६.२० पैगंबरांच्या आज्ञा पाळल्याने ईश्वराच्या दयेस पात्र ठरण्याची आशा केली जाऊ शकते.

''आणि पैगंबर (स.) यांची आज्ञा पाळा, आशा आहे की तुमच्यावर दया केली जाईल. जे लोक द्रोह करीत आहेत, त्यांच्यासंबंधी असा गैरसमज करून घेऊ नका की ते पृथ्वीवर अल्लाहला नमवतील. त्यांचे स्थान नरक आहे आणि ते अत्यंत वाईट स्थान आहे.'' (दिव्य कुरआन, २४ : ५६-५७)

६.२१ पैगंबर (स.) यांची अवज्ञा करणाऱ्यांना भीती बाळगवयास हवी.

''पैगंबर (स.) यांची आज्ञा भंग करणाऱ्यांना भीती असली पाहिजे की त्यांनी एखाद्या उपद्रवात अडकू नये अथवा त्यांच्यावर दु:खदायक प्रकोप कोसळू नये. सावध राहा आकाश व पृथ्वीत जे काही आहे ते अल्लाहचे आहे.''

(दिव्य कुरआन, २४ : ६३-६४)

६.२२ पैगंबर (स.) यांना साथ न देणारे व विमुख असलेले अन्यायी लोक आपल्या हाताचे चावे घेतील आणि पश्चाताप व्यक्त करतील.

''त्या दिवशी खरी बादशाही केवळ कृपावंताचीच असेल आणि तो इन्कार करणाऱ्यांसाठी अत्यंत कठोर दिवस असेल. अत्याचारी मनुष्य आपल्या हाताचा चावा घेईल आणि खेदाने म्हणेल, ''मी पैगंबरांना साथ दिली असती! माझे दुर्दैव! मी अमुक इसमाला मित्र बनविले नसते! त्याच्या बहकविण्यामुळे मी तो उपदेश मानला नाही जो माझ्याकडे आला होता. शैतान माणसासाठी मोठा घातकी ठरला.'' आणि पैगंबर

म्हणेल, हे माझ्या रब! माझ्या लोकांनी या कुरआनला थट्टेचे लक्ष बनविले होते.''

(दिव्य कुरआन, २५ : २६-३०)

६.२३ इमानधारक स्त्री व पुरुषाला अल्लाह व त्याच्या पैगंबराने निर्णय दिल्यानंतर स्वतः निर्णय घेण्याचा अधिकार राहात नाही.

''कोणत्याही इमानधारक पुरुषाला आणि कोणत्याही इमानधारक स्त्रीला हा अधिकार नाही की जेव्हा अल्लाह व त्याचे पैगंबर (स.) यांनी एखाद्या बाबतीत निर्णय दिला असेल तर मग त्या बाबतीत स्वत: निर्णय घेणे त्याच्या अखत्यारित असेल आणि जो कोणी अल्लाह व त्याचे पैगंबर (स.) यांची अवज्ञा करील तर तो उघडपणे मार्गभ्रष्टतेत पडेल.''

(दिव्य कुरआन, ३३ : ३६)

६.२४ जहन्नमवाली त्या दिवशी म्हणतील, ''अरेरे जर आम्ही अल्लाहचे व त्याच्या पैगंबरांचे आज्ञापालन केले असते तर किती बरे झाले असते.''

''अल्लाहने सत्य नाकारणाऱ्या अधर्मियांचा धिक्कार केला आहे आणि त्यांच्यासाठी भडकलेली आग तयार ठेवली आहे ज्यात ते सदैव राहतील. कोणताही समर्थक व सहायक ते मिळवू शकणार नाहीत ज्या दिवशी त्यांचे चेहरे आगीवर उलथेपालथे केले जातील. त्या वेळी ते खेदाने म्हणतील, ''आम्ही अल्लाह व त्याचे पैगंबर (स.) यांचे आज्ञापालन केले असते!'' आणि म्हणतील, हे आमच्या पालनकर्त्या! आम्ही आमच्या सरदारांचे व आमच्या जेष्ठांचे आज्ञापालन केले आणि त्यांनी आम्हाला सरळमार्गापासून मार्गभ्रष्ट केले.''(दिव्य कुरआन, ३३ : ६४ - ६७)

६.२५ ज्याने अल्लाह व त्याच्या पैगंबराचे आज्ञापालन केले त्याने मोठे यश मिळविले.

''हे इमानधारकांनो! अल्लाहच्या कोपाचे भय बाळगा आणि नेहमी सत्य व रास्त बोला. अल्लाह तुमचे आचरण सुधारील आणि तुमच्या अपराधांना क्षमा करील. ज्याने अल्लाह व त्याचा पैगंबर (स.) यांच्या आज्ञा पाळल्या त्याने मोठे यश प्राप्त केले.''

(दिव्य कुरआन, ३३ : ७०-७१)

६.२६ अल्लाह पैगंबरांचे आज्ञापालन न केल्याने सर्व कृत्ये वाया जातात.

"ज्या लोकांनी कुफ्र (द्रोह) केले आणि अल्लाहच्या मार्गापासून रोखले आणि पैगंबराबरोबर भांडण केले जेव्हा की त्यांच्यावर सरळमार्ग स्पष्ट झाला होता. वस्तुत:ते अल्लाहची कोणतीही हानी करू शकत नाही तर अल्लाहच त्यांचे सर्व केले सवरलेले नष्ट करील. हे इमानधारकांनो! तुम्ही अल्लाहचे आज्ञापालन करा आणि आपल्या सत्कृत्यांना नष्ट करून घेऊ नका." (दिव्य कुरआन, ४७ : ३२-३३)

६.२७ पैगंबर (स.) यांच्याशी प्रतिज्ञा करणे अल्लाहशी प्रतिज्ञा करणे होय.

"हे पैगंबर (स.)! जे लोक तुमच्याशी 'बैअत' (प्रतिज्ञा) करीत होते वास्तविकत: ते अल्लाहशी 'बैअत' करीत होते. त्यांच्या हातावर अल्लाहचा हात होता. आता जो ती प्रतिज्ञा भंग करील त्याचे प्रतिज्ञा भंग करण्याचे अरिष्ट त्याच्या स्वत:वरच येईल आणि जो त्या प्रतिज्ञेचे पालन करील जी त्याने अल्लाहशी केलेली आहे, अल्लाह लवकरच त्याला महान मोबदला प्रदान करील."

(दिव्य कुरआन, ४८ : १०)

६.२८ अल्लाह व त्याच्या पैगंबरांची आज्ञाधारकता स्वीकारली तर तुमच्या कर्मांचा तुम्हाला पूरेपूर मोबदला मिळेल.

"जर तुम्ही अल्लाह आणि त्याचे पैगंबर (स.) यांची आज्ञाधारकता स्वीकारली तर तो तुमच्या कर्म-मोबदल्यात कोणतीही कमतरता करणार नाही. खचितच अल्लाह मोठा क्षमाशील आणि परमकृपाळू आहे." (दिव्य कुरआन, ४९ : १४)

७. पैगंबरावरील अल्लाहच्या विशेष कृपा

७.१ पैगंबर (स.) यांना नमाजच्या दिशेसाठी जो 'किबला' अधिक आवडता होता, अल्लाहने त्यालाच सर्व मुस्लिमांसाठी 'किबला' ठरवून दिला.

"हे पैगंबर (स.)! तुमचे वारंवार आकाशाभिमुख होणे आम्ही पहात आहोत. म्हणून आम्ही त्याच किबल्याकडे (उपासना दिशेकडे) तुम्हाला वळवितो जे तुम्हाला अधिक पसंत आहे. तेव्हा मस्जिदे हरामकडे (काबागृहाकडे) तोंड करा. यापुढे जिथे कुठे तुम्ही असाल, तिथून तिच्याकडे तोंड करून नमाज पठण करा."

(दिव्य कुरआन, २ : १४४)

७.२ पैगंबर (स.) यांच्यावर अल्लाहची मोठी कृपा होती.

"हे पैगंबर (स.)! जर अल्लाहची कृपा तुमच्यावर नसती व त्याची दया तुमच्या सोबत नसती तर त्यांच्यातील एका गटाने तुमचा गैरसमज करण्याचा निश्चय केला होता. खरे पाहता वस्तुस्थिती अशी होती की ते स्वत: आपल्या व्यतिरिक्त इतर कोणाचा गैरसमज करीत नव्हते आणि तुमचे काही नुकसान करू शकत नव्हते. अल्लाहने तुमच्यावर ग्रंथ व विवेक अवतरित केला आहे आणि तुम्हाला ते सर्वकाही ज्ञात करून दिले आहे जे तुम्हाला माहीत नव्हते आणि त्याची कृपा तुम्हांवर मोठी आहे."

(दिव्य कुरआन, ४ : ११३)

७.३ पैगंबर (स.) यांच्यासाठी सर्वकाही आणि कृपाही परिपूर्ण करण्यात आले.

"आज काफिरांना तुमच्या धर्माकडून पूर्ण निराशा झाली आहे म्हणून तुम्ही त्यांना भिऊ नका तर माझ्या कोपाचे भय बाळगा. आज रोजी मी तुमचा धर्म तुमच्याकरिता परिपूर्ण केला आहे आणि आपली कृपा तुम्हावर परिपूर्ण केली आहे."

(दिव्य कुरआन, ५ : ३)

७.४ अल्लाह लोकांच्या दुष्टतेपासून पैगंबरांचे रक्षण करणारा आहे.

"हे पैगंबर (स.)! जे काही तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्यावर अवतरले आहे ते लोकांपर्यंत पोहोचवा. जर तुम्ही असे केले नाही तर पैगंबरत्वाचे कर्तव्य पार पाडले नाही. अल्लाह तुम्हाला लोकांच्या दुष्टतेपासून वाचविणारा आहे. खात्री बाळगा की तो

काफिरांना (तुमच्या विरोधात) यशाचा मार्ग मुळीच दाखविणार नाही.''

(दिव्य कुरआन, ५ : ६७)

७.५ युद्धाप्रसंगी अल्लाहकडून पैगंबरासाठी मदतीची विशेष व्यवस्था.

''त्या दोन्ही गटांमध्ये तुमच्यासाठी बोधचिन्ह होते जे (बदरच्या युद्धात) एक दुसऱ्याशी भिडले. एक गट अल्लाहच्या मार्गात लढत होता आणि दुसरा गट कुफ्र करणारा होता. पहाणारे उघड्या डोळ्यांनी पाहात होते की कुफ्र (द्रोह) करणाऱ्यांचा गट मुस्लिमांच्या गटापेक्षा दुप्पट आहे. पण (परिणामाने सिद्ध करून दाखविले की) अल्लाह आपल्या विजयाने व सहाय्याने हवे त्याला मदत देतो. डोळसपणा बाळगणाऱ्यांसाठी त्यामध्ये उत्तम बोध दडलेला आहे.'' (दिव्य कुरआन, ३ : १३)

७.६ शत्रूंच्या कटकारस्थानांपासून पैगंबरांचे अल्लाहकडून संरक्षण.

''आणि तो प्रसंग देखील आठवण्याजोगा आहे जेव्हा काफिर (सत्य नाकारणारे) तुझ्याविरुद्ध युक्त्या योजित होते की एक तर तुला कैद करावे अथवा ठार मारावे किंवा देशांतर करावे. ते आपल्या चाली खेळत होते आणि अल्लाह आपली युक्ती करत होता. निःसंशय अल्लाह सर्वोत्तम किमया करणारा आहे.''

(दिव्य कुरआन, ८ : ३०)

७.७ पैगंबरांच्या उपस्थितीत अल्लाहने अपराधी लोकांवर प्रकोप कोसळविला नाही.

''आणि ती गोष्ट देखील स्मरणात आहे जी त्यांनी सांगितली होती, ''हे अल्लाह! जर हे खरोखर सत्य आहे तुझ्याकडून तर आमच्यावर आकाशांतून दगडांचा वर्षाव कर किंवा एखादा दुःखदायक प्रकोप आमच्यावर आण.'' त्यावेळेस तर अल्लाह त्यांच्यावर प्रकोप कोसळविणार नव्हता जेव्हा तू त्यांच्यामध्ये उपस्थित होतास. आणि हा अल्लाहचा शिरस्ता नव्हे की लोक क्षमा मागत आहेत आणि त्याने त्यांना यातना द्याव्यात.'' (दिव्य कुरआन, ८ : ३२-३३)

७.८ अदृश्य सैन्याने त्यांची मदत केली गेली.

''अल्लाहने यापूर्वी अनेक प्रसंगी तुम्हाला मदत केलेली आहे. नुकतेच हुनैनच्या युद्धाच्या दिवशी (त्याने केलेल्या मदतीचे वैभव तुम्ही पाहिले आहे) त्या दिवशी तुम्हाला आपल्या मोठ्या संख्येचा गर्व होता पण ती तुमच्या काहीच उपयोगी पडली नाही व जमीन विस्तृत असूनदेखील तुमच्याकरिता तंग झाली व तुम्ही पाठ दाखवून

पळत सुटला. मग अल्लाह ने आपली 'सकीनत' (मन:शांती) आपल्या पैगंबरावर व इमानधारकांवर उतरविली आणि ते लष्कर उतरविले जे तुम्हाला दिसत नव्हते आणि कुफ्र करणाऱ्यांना (सत्य नाकारणाऱ्यांना) शिक्षा दिली की हाच बदला आहे त्यांच्याकरिता जे कुफ्र करतील. (सत्याचा इन्कार करतील.)''

(दिव्य कुरआन, ९ : २५-२६)

७.९ एका रात्रीत पैगंबर (स.) यांना काबागृह (मक्का) येथून 'बैतुल मुकद्दस' (जेरूसलेम) पर्यंतचा प्रवास करविला गेला.

''पवित्र आहे तो जो घेऊन गेला एका रात्री आपल्या दासाला मस्जिद-ए-हराम (काबागृह) पासून दूरच्या त्या मस्जिदपर्यंत जिच्या वातावरणाला त्याने समृद्धी दिली आहे. जेणेकरून त्याला आपल्या काही संकेतांचे निरीक्षण घडवावे. वास्तविकपणे तोच आहे सर्वकाही ऐकणारा व पाहणारा.'' (दिव्य कुरआन, १७ : १)

७.१० पैगंबर (स.) यांना स्तुत्य स्थानारूढ केले गेले.

''नमाज कायम करा मध्यान्हीनंतर ते रात्रीच्या अंधारापर्यंत आणि प्रात:कालीन कुरआन (पठण) देखील आवश्य करा, कारण प्रात:कालीन कुरआन साक्षात असतो. (ज्यावर ईशदूत साक्षी देतात.) रात्री 'तहज्जूद' (विशेष नमाज) पठण करा. ही तुम्हासाठी 'नफ्ल' (अतिरिक्त) देणगी आहे. जेणेकरून तुमच्या पालनकर्त्याने तुम्हास स्तुत्यस्थानावर आरूढ करावे.'' (दिव्य कुरआन, १७ : ७८-७९)

७.११ सकल जगावासीयांसाठी पैगंबरांना कृपा बनवून पाठविण्यात आले आहे.

''हे पैगंबर (स.)! आम्ही तर तुम्हाला जगवासियांसाठी कृपा बनवून पाठविले आहे. त्यांना सांगा, ''माझ्यापांशी जो दिव्यबोध येतो तो असा आहे की तुमचा ईश्वर केवळ एकच अल्लाह आहे, मग तुम्ही आज्ञापालनासाठी मान तुकविता काय?''

(दिव्य कुरआन, २१ : १०७-१०८)

७.१२ पैगंबर मुहम्मद (स.) यांच्या पत्नी मुस्लिमांच्या माता आहेत.

''इमानधारकांसाठी पैगंबरांचे स्थान त्यांच्या स्वत:च्या जीवापेक्षा वरचढ आहे आणि नबीच्या पत्नीं त्यांच्या माता आहेत.'' (दिव्य कुरआन, ३३ : ६)

७.१३ पैगंबर मुहम्मद (स.) यांच्यावर पैगंबरत्वाची समाप्ती झाली आहे.

"लोकहो! मुहम्मद (स.) तुमच्या पुरुषांपैकी कोणाचे पिता नाहीत परंतु ते अल्लाहचे पैगंबर आणि अंतिम पैगंबर आहेत, आणि अल्लाह प्रत्येक वस्तूचे ज्ञान राखणारा आहे." (दिव्य कुरआन, ३३ : ४०)

७.१४ पैगंबरांच्या निधनानंतर त्यांच्या विधवा पत्नींशी मुस्लिम विवाह करू शकत नाही.

"हे लोकहो! ज्यानी इमान धारण केले आहे, नबी (स.) यांच्या घरांत विना परवानगी प्रवेश करू नका. जेवणाच्या वेळेवरही नजर ठेवून असू नका. जर तुम्हाला जेवायला बोलाविले गेले तर आवश्य या. परंतु जेवण उरकले की निघून जा, गोष्टी करण्यात लागू नका. तुमच्या या कृती नबी (स.) यांना त्रास देतात परंतु ते संकोचाने काही बोलत नाहीत आणि अल्लाहला खरी गोष्ट सांगण्यात संकोच वाटत नाही. नबी (स.) यांच्या पत्नींपासून जर तुम्हाला काही मागावयाचे असल्यास पडद्यामागून मागत जा. ही तुमच्या आणि त्यांच्या हृदयाच्या निर्मळतेसाठी अधिक उचित पद्धती आहे. तुमच्याकरिता हे कदापि वैध नाही की अल्लाहचे पैगंबर (स.) यांना तुम्ही त्रास द्यावा आणि हेदेखील वैध नाही की त्यांच्या पश्चात त्यांच्या पत्नींशी विवाह करावा. हा अल्लाहजवळ फार मोठा गुन्हा आहे. तुम्ही भले कोणतीही गोष्ट प्रकट करा अथवा गुप्त राखा, अल्लाहला प्रत्येक गोष्टीचे ज्ञान आहे." (दिव्य कुरआन, ३३ : ५३-५४)

७.१५ अखिल मानवजातीसाठी पैगंबरांना खुशखबर देणारा व सावध करणारा बनवून पाठविलेले आहे.

"आणि (हे पैगंबर (स.)!), आम्ही तुम्हाला अखिल मानवजातीसाठी शुभवार्ता देणारा आणि सावधान करणारा बनवून पाठविले आहे. परंतु बहुतेक लोक जाणत नाहीत." (दिव्य कुरआन, ३४ : २८)

७.१६ ऐहिक जीवनातच अल्लाहने पैगंबरांना आपल्याजवळ बोलावून घेतले.

"आणि एकदा पुन्हा त्याने 'सिदरतुलमुन्तहा' (चरम सीमेवरील बोरीचे झाड) जवळ त्याला उतरताना पाहिले जेथे जवळच निवासाची जन्नत (जन्नतुल मावा) आहे. त्यावेळी बोरीला आच्छादित होते जे काही आच्छादित होते. दृष्टी न विचलीत झाली न

मर्यादेपलीकडे गेले आणि त्याने आपल्या पालनकर्त्याचे मोठमोठे संकेत पाहिले.''

(दिव्य कुरआन, ५३ : १३-१८)

७.१७ पैगंबर (स.) यांच्या आवाजापेक्षा उंच आवाजात बोलण्यामुळे मनुष्याचे केले सवरले सर्व वाया जाऊ शकते.

''आणि अल्लाहचे भय बाळगा, अल्लाह सर्वकाही ऐकणारा व जाणणारा आहे. हे लोकहो! ज्यांनी इमान धारण केले आहे, आपला आवाज नबी (स.) यांच्या आवाजापेक्षा उंच करू नका आणि नबी (स.) बरोबर उंच आवाजात बोलूसुद्धा नका ज्याप्रमाणे तुम्ही आपापसांत एकमेकांशी बोलता. एखादे वेळी असे होऊ नये की तुम्ही केले सवरलेले सर्व वाया जावे आणि तुम्हाला कळूसुद्धा नये. जे लोक अल्लाहच्या पैगंबरांपाशी बोलताना आपला आवाज खाली ठेवतात ते वास्तविकत: तेच लोक होत ज्यांच्या हृदयांना अल्लाहने ईशपरायणतेसाठी पारखले आहे, त्यांच्यासाठी क्षमा आहे आणि महान मोबदला. हे पैगंबर (स.)! जे लोक तुम्हाला घराच्या बाहेरून हाका मारतात; त्यापैकी बहुतेकजण निर्बुद्ध आहेत. जर त्यांनी तुमच्या बाहेर येण्यापर्यंत धीर धरला असता तर त्यांच्यासाठी उत्तम होते, अल्लाह क्षमा करणारा व परम दयाळू आहे.''

(दिव्य कुरआन, ४९ : १-५)

७.१८ अल्लाहने पैगंबर (स.) यांना या जगातील व पारलौकिक जीवनातील देणग्यांनी समृद्ध केले आहे.

''शपथ आहे प्रकाशमान दिवसाची आणि रात्रीची जेव्हा ती शांतपणे पसरते. हे पैगंबर (स.)! तुमच्या पालनकर्त्याने तुम्हाला मुळीच सोडलेले नाही आणि तो नाराजही झाला नाही. निश्चित तुमच्यासाठी पारलौकिक जीवन या जगातील जीवनापेक्षा उत्तम आहे. लवकरच तुमचा पालनकर्ता तुम्हाला इतके देईल की तुम्ही प्रसन्न व्हाल. काय त्याने तुम्हाला अनाथ पाहिले नाही, मग त्याने ठिकाण उपलब्ध करून दिले? त्याने तुम्हाला मार्ग अनभिज्ञ पाहून मार्गदर्शन केले. आणि तुम्ही गरीब आढळला आणि मग श्रीमंत केले. म्हणून अनाथांवर सक्ती करू नका आणि याचकाला झिडकारू नका. आणि आपल्या पालनकर्त्याच्या देणगीची अभिव्यक्ती करा.''

(दिव्य कुरआन, ९३ : १-११)

७.१९ पैगंबर (स.) यांचे लौकिक सर्वत्र दुमदुमविले.

"हे पैगंबर (स.)! काय आम्ही तुमचे मन तुमच्यासाठी उघडले नाही? आणि तुमच्यावरून ते भारी ओझे उतरविले जे तुमची कंबर मोडत होते आणि तुमच्याखातर तुमच्या लौकिकाचा नाद दुमदुमविला. तर वस्तुस्थिती अशी आहे की अडचणींबरोबर संपन्नताही आहे. नि:संशय अडचणींबरोबर संपन्नताही आहे. म्हणून जेव्हा तुम्ही मोकळे व्हाल तेव्हा उपासनेच्या परिश्रमात लागा आणि आपल्या पालनकर्त्याकडेच ओढ ठेवा."

(दिव्य कुरआन, ९४ : १-८)

७.२० पैगंबर (स.) यांना 'कौसर' प्रदान केले.

"हे पैगंबर (स.)! आम्ही तुम्हाला 'कौसर' प्रदान केले. म्हणून तुम्ही आपल्या पालनकर्त्यासाठीच नमाज अदा करा व कुर्बानी करा. तुमचा शत्रुच मुळासकट नष्ट केलेला आहे."

(दिव्य कुरआन, १०८ : १-३)

७.२१ पैगंबर (स.) यांच्या अनुयायांच्या संख्येत भरभराट व वृद्धी झाली.

"जेव्हा अल्लाहची मदत येते आणि विजय प्राप्त होतो आणि हे पैगंबर (स.) तुम्ही पाहिले की लोक झुंडी झुंडीने अल्लाहच्या धर्मात प्रवेश करीत आहेत. तेव्हा आपल्या पालनकर्त्याच्या स्तुतीबरोबरच त्याचे पावित्र्यगान करा आणि त्याच्याकडे क्षमेची प्रार्थना करा. नि:संदेह तो मोठा पश्चाताप स्वीकारणारा आहे."

(दिव्य कुरआन, ११० : १-३)

- ०- स्माप्त -० -